| | | | |
|---|---|---|---|
| खटला दाखल तारीख | : १४/०६/२०२३ | | |
| खटला फैलावर तारीख | : १६/०६/२०२३ | | |
| खटला निकाल तारीख | : २७/०३/२०२६ | | |
| कालावधी | वर्षे | महिने | दिवस |
| | ०२ | ०९ | ११ |
| निशाणी क्रमांक | : **४७/ब** | | |

भाग अ

<u>प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी आर्णी, जि. यवतमाळ यांच्या न्यायालयात</u>

(पिठासीन अधिकारी : श्रीमती रोशनी दिपक चौबे)

सरकारतर्फे सहा. पोलिस निरीक्षक
आर्णी पोलिस ठाणे
ता. आर्णी, जि. यवतमाळ. } ... अभियोग पक्ष.

विरुध्द

क्र.१ प्रविण आनंदा जाधव, वय- ३० वर्षे,
क्र.२ आनंदा बळीराम जाधव, वय- ६० वर्षे,
क्र.३ सावित्री आनंदा जाधव, वय- ५५ वर्षे,
क्र. १ ते ३ फुलउमरी ता. मानोरा जि. वाशिम
क्र.४ राजेश बबन राठोड, वय- ४२ वर्षे,
क्र.५ सिमा राजेश राठोड, वय-३५ वर्षे,
क्र.४ व ५ गहुली पोस्ट तिवसा ता.जि.यवतमाळ } .......... आरोपी

<u>दोषारोप **:** भा. दं. वि. कलम ४९८-अ,५०६ सह. ३४ प्रमाणे</u>.

| | | |
|---|---|---|
| अभियोग पक्षातर्फे शासकीय अभियोक्ता | : | ॲड.श्री. आर.पी.गावंडे |
| आरोपींतर्फे विधिज्ञ | : | ॲड.आर.एन.दातीर |

# न्यायनिर्णय

(दिनांक २७/०३/२०२६ रोजी घोषीत)

भाग ब

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याची तारीख | १४/०१/२०२३ रोजीपूर्वी |
| फिर्याद दाखल केल्याची तारीख | ३१/०३/२०२३ |
| दोषारोपपत्र दाखल केल्याची तारीख | १४/०६/२०२३ |
| दोषारोप निश्चीत केल्याची तारीख | १९/०६/२०२४ |
| पुरावा सुरु झाल्याची तारीख | ०६/०२/२०२६ |
| न्यायनिर्णय करीता प्रकरण ठेवल्याची तारीख | २७/०३/२०२६ |
| न्यायनिर्णय जाहीर केल्याची तारीख | २७/०३/२०२६ |
| दोषी व्यक्तीस जेलमध्ये पाठविल्याची तारीख, लागु असल्यास | - |

आरोपीची माहिती

| क्र. | नाव | अटकेची तारीख | जामिनावर सोडल्याची तारीख | गुन्ह्याची कलमे | आरोपीस निर्दोष मुक्त केले की सिध्ददोष | दिलेली शिक्षा | संपरिक्षे दरम्यान जेलमध्ये पाठविल्याचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | प्रविण आनंदा जाधव | - | ३/०५/२५ | भा. दं. वि. कलम ४९८-अ, ५०६ सह. ३४ | निर्दोष मुक्त | - | - |
| २ | आनंदा बळीराम जाधव | | | | | | |
| ३ | सावित्री आनंदा जाधव | | | | | | |
| ४ | राजेश बबन राठोड | | | | | | |
| ५ | सिमा राजेश राठोड | | | | | | |

प्रस्तुत खटल्यामध्ये आरोपींविरुध्द भारतीय दंड विधान कलम ४९८-अ,५०६ सह. ३४ अन्वये शिक्षापात्र अपराधाकरिता संपरिक्षा घेण्यात आली.

२. <u>अभियोग पक्षाची थोडक्यात हकीकत खालीलप्रमाणेः-</u>

दिनांक ३१/०३/२०२३ रोजी मौजे आर्णी येथे फिर्यादी हिला आरोपी क्र.१ याने लग्न झाल्यानंतर काही दिवस चांगले वागविले व नंतर 'तुला स्वयंपाक येत नाही, तु दिसायला काळी आहे असे म्हणून शारिरिक व मानसिक त्रास दिला. तसेच हुंड्याचे ७० हजार घेवून ये नाहीतर येवू नको' वगैरे मजकूराच्या फिर्यादीवरुन आरोपींविरुध्द गु.र.नं.१८५/२०२३ भारतीय दंड संहिता कलम ४९८-अ,५०६ सह. ३४ अन्वये नोंदविण्यात आला. तपास अधिकारी यांनी घटनेचा पुढील तपास केला. त्यांनी साक्षीदारांचे जबाब नोंदविले, घटनास्थळाचा पंचनामा केला. तपासाअंती

आरोपींविरूध्द पुरेसा पुरावा गोळा झाल्याने दोषारोपपत्र दाखल केले.

३. आरोपींविरूध्द भारतीय दंड संहिता कलम ४९८-अ,५०६ सह. ३४ अन्वये शिक्षेस पात्र असणारा दोषारोप (नि.क्र.२८) निश्चित करण्यात आला. आरोपींनी गुन्हा कबूल नसल्याचे सांगून खटल्याला सामोरे जाण्याची तयारी दर्शवली. आरोपींविरुध्द कोणताही पुरावा न आल्याने त्यांचा फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ प्रमाणे जबाब नोंदविण्यात आला नाही.

४. सहाय्यक शासकीय अभियोक्ता व आरोपींतर्फे विधिज्ञ यांचा युक्तिवाद ऐकला व पुराव्याअंती न्यायनिर्णयाकरिता खालील वादप्रश्न उपस्थित झाले व त्यावरील निष्कर्ष कारणमिमांसेसह पुढीलप्रमाणे देण्यात येतात.

| अ.क्र. | वादप्रश्न | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | अभियोगपक्षाने हे सिध्द केले का की, दिनांक १४/०१/२०२३ रोजीपूर्वी फिर्यादी हिला आत्महत्या क्रमप्राप्त होईल अथवा तिला दुखापल होईल अथवा तिच्या जिवीताला, अंगाला किंवा स्वास्थाला मानसिक व शारीरिक धोका निर्माण होईल अशा तऱ्हेची क्रूर वागणुक दिली व त्यायोगे भारतीय दंड विधान कलम ४९८-अ अन्वये शिक्षापात्र अपराध केला ? | ... नाही. |
| २ | उपरोक्त तारीख, वेळी व ठिकाणी आरोपींनी संगनमत करुन फिर्यादी हिला जिवे ठार मारण्याची धमकी दिली व त्यायोगे भारतीय दंड विधान कलम ५०६ सह. ३४ अन्वये शिक्षापात्र अपराध केल्याचे अभियोग पक्ष शाबीत करतो काय ? | ... नाही. |
| ३ | आदेश काय ? | आरोपीची निर्दोष मुक्तता. |

५. कारणमिमांसेच्या आधी याठिकाणी नमूद करणे आवश्यक आहे की, फिर्यादी व आरोपी यांच्यामध्ये न्यायालयाबाहेर तडजोड झालेली आहे. आरोपींविरूध्दचा दोषारोप सिध्द करण्यासाठी अभियोगपक्षाने एक साक्षीदार तपासला, तसेच काही कागदोपत्री पुरावे दाखल केले. त्यांचा संदर्भ यापुढे वेळोवेळी घेण्यात येत आहे. उभय पक्षांचा युक्तिवाद ऐकला.

भाग क

साक्षीदारांची यादी.

| अभियोगपक्षाचे साक्षीदार | | |
|---|---|---|
| क्र. | नाव | साक्षीदाराचा प्रकार |
| अ.सा.क्र.१ | स्नेहल प्रविण जाधव | फिर्यादी |
| बचाव पक्षाचे साक्षीदार | | |
| - | - | - |
| न्यायालयाचे साक्षीदार | | |
| - | - | - |

निशाणी क्रमांक दिलेले कागदपत्रांची यादी.

| अभियोगपक्षाची कागदपत्रे | | |
|---|---|---|
| क्र. | निशाणी क्रमांक | कागदपत्राचे वर्णन |
| १ | निशाणी ४३/अ.सा.क्र.१ | फिर्यादीवरील सही. |
| २ | निशाणी ४४/अ.सा.क्र.१ | छापील खबरेवरील सही. |
| बचाव पक्षाची कागदपत्रे | | |
| - | - | - |
| न्यायालयाची कागदपत्रे | | |
| - | - | - |
| आर्टीकल | | |
| - | - | - |

<u>का र ण मि मां सा</u>

<u>वादप्रश्न क्रमांक १ ते ३ करीता</u>:-

६. अभियोग पक्षातर्फे फिर्यादी स्नेहल प्रविण जाधव (अ.सा.क्र.१) यांना नि.क्र.४२ कडे तपासण्यात आले. फिर्यादी यांनी शपथेवर कथन केले की, माझे लग्न आरोपी क्र.१ याचे सोबत दि.२५/०४/२०२२ रोजी झाले होते. लग्नानंतर मी माझ्या सासरी फुलउमरी येथे नांदायला आले. माझे आरोपीं सोबत शाब्दीक वाद झाले होते. मी रागाच्या भरात रिपोर्ट दिला होता. त्यातील मजकूराबाबत मला माहीती नाही.फिर्यादी यांनी अभियोगपक्षाला पुरक साक्ष दिली नाही. अभियोगपक्षातर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासात असे आले की, फिर्यादीतील रेखांकीत भाग अ माझे सांगणेप्रमाणे लिहीलेला नाही. तो पोलीसांनी कसा काय लिहुन घेतला याचे कारण सांगता येत नाही.

७. सदर प्रकरणात फिर्यादी यांनी अभियोगपक्षाला पुरक साक्ष दिली नाही. अभियोगपक्षा तर्फे प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, पंच व तपास अधिकारी यांना तपासण्यात आले नाही. तसेच आरोपी क्र.१ यांनी कोणत्या पध्दतीने शारीरीक व मानसिक छळजाच केला ते अभिलेखावर आले नाहीत. त्यामुळे आरोपींनी गुन्हा केल्याचे सिध्द होत नाही. आरोपींविरुध्द कोणताही पुरावा अभिलेखावर आलेला नाही. त्यामुळे मुद्दा क्र.१ व २ चे उत्तर मी नकारार्थी नोंदवित आहे.

<u>वादप्रश्न क्र.३ करिता</u>:-

८. आरोपींविरुध्द कोणताही पुरावा अभिलेखावर न आल्याने अभियोगपक्ष आरोपींविरूध्दचा दोषारोप सिध्द करू शकला नाही. त्यामुळे आरोपी हे निश्चितपणे निर्दोष सुटका होण्यास पात्र होत आहे. म्हणून वादप्रश्न ४ चे उत्तर नोंदवितांना मी पुढीलप्रमाणे आदेश पारीत करीत

आहे -

<u>आ दे श</u>

| | |
|---|---|
| १. | आरोपी क्र.१ प्रविण आनंदा जाधव, क्र.२ आनंदा बळीराम जाधव, क्र.३ सावित्री आनंदा जाधव, क्र.४ राजेश बबन राठोड व क्र.५ सिमा राजेश राठोड यांना फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २४८(१) अन्वये भारतीय दंड विधान कलम ४९८-अ,५०६ सह.३४ अन्वये शिक्षापात्र अपराधातून निर्दोष मुक्त करण्यात येते. |
| २. | आरोपींनी फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७(अ) अन्वये दिलेला जामीन आज रोजी पासून पुढील ६ महिन्यांच्या कालावधीकरिता अस्तीत्वात राहील. |

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित)

स्वा/-

दिनांकः२७/०३/२०२६
स्थळः आर्णी

(रोशनी दिपक चौबे)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग
न्यायालय क्र.२